महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org


जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/ ७६८ दिनांक : 5 MAR 2020

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/

उस्मानाबाद/पु.ला.लातूर/महिला निवासी लातूर

विषय : **शासकीय कार्यालये / इमारतीच्या परिसरात अटल आनंदवन घन वन लागवड करणे बाबत.**

संदर्भ : मा.विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०२०/वृ.सं.क/हरित महाराष्ट्र/ घनला/कावि-३२, दिनांक :- ०२.०३.२०२०

वरील संदर्भीय विषयी सन २०१९ च्या पावसाळयात मराठवाडयात काही ठिकाणी घन लागवड करण्यात आली असून त्याचे परिणाम अतिउत्कृष्ट असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे औरंगाबाद महसूल विभागातील सर्व शासकीय कार्यालये इमारती परिसरात ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे त्या त्या ठिकाणी "मियावाकी" पध्दतीने घनलागवड करण्याबाबत विभागीय आयुक्त कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

सदर कामाची सुरुवात मार्च २०२० पासून करण्यात यावी. लागवड पूर्व कामे करण्यासाठी जिल्हयात ज्या ज्या ठिकाणी शासकीय किंवा शासन अंगीकृत जे.सी.बी./ पोकल्यांन मशीन उपलब्ध आहेत. त्याचा वापर करुन घन लागवड करण्याच्या ठिकाणी किमान एक मिटर खोल माती खोदून भुसभुशीत करण्यात यावी. त्यामध्ये काही प्रमाणात तलावातील गाळ, शेणखत, वाळलेला पाला-पाचोळा टाकुन मिश्रण करुन माहे एप्रिल व मे च्या उन्हाळयात तयार ठेवावेत.

मृग नक्षत्राचा पाऊस पडल्यानंतर तात्काळ मियावाकी पध्दतीने घन लागवड करण्यात यावी. लागवड केल्यानंतर मातीवर ऊसाचे पाचट किंवा इतर वाळलेला पाला-पाचोळा, टाकूण माती झाकावी. आवश्यकते प्रमाणे ठिबक सिंचनाव्दारे पाणी देण्यात यावे, मियावाकी पध्दतीने लावलेल्या वृक्षांची वाढ इतर पध्दतीने लावलेल्या वृक्षाच्या दुप्पट वेगाने वाढते. त्यामुळे मराठवाडयात मियावकी पध्दतीने घन लागवड केल्यास लवकरच वृक्ष रांझी तयार होईल. अशा पध्दतीने लावलेल्या वृक्षाच्या संरक्षणाची व संगोपनाची जबाबदारी कार्यालयातील कर्मचा-यावर सोपविण्यात यावी. तसेच केलेल्या उत्कृष्ट कामाची नोंद त्यांच्या गोपनिय अहवालात घेण्यात यावी.

कार्यालय परिसरात वृक्षाचे मोठया प्रमाणात अस्तित्व असल्यास भरपूर प्रमाणात ऑक्सिजन मिळतो आणि वातावरण प्रसन्न राहते, त्यामुळे कर्मचा-याची कार्यक्षमता देखील वाढते. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.सावनि-२०१९/प्र.क्र.३/फ-११ दिनांक २५ जून २०१९ अन्वये मियावाकी घन वन लागवडीचे नामकरण **अटल आनंदवन घन वन प्रकल्प** असे केले आहे. आपण सर्वांनी **"अटल आनंदवन घन वन लागवड"** कार्यक्रमामध्ये हिरीरीने सहभाग घ्यावा. केलेल्या घन वन लागवडीची नोंद वन विभागाच्या संकेत स्थळावर अक्षांश रेखांश सह फोटो/चलचित्र (१ ते २ मिनीटाचे) अनलोड करावेत आपण केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल मा. विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत याकार्यालयास सादर करावी.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- ०१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

०२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

~~०३) या~~ कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.